पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 09/02/2018 (शुक्रवार)
(संध्याकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बोरी :– पो.स्टे. बोरी येथे दिनांक 21/12/2016 रोजी फिर्यादी, वय 17 वर्ष हिचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अप. क्र. 903/2016 कलम 354, 341 भांदवी. सहकलम कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिंनाक 21/12/2016 चे 17.15 वा. दरम्यान लेन्डी पुलीया बायपास रोड जुनी वस्ती बोरी येथे फिर्यादी पिडीत मुलगी, (विद्यार्थी) वय 17 वर्ष ही कम्युटर क्लास करून आपले घरी जात असता यातील आरोपी नामे– मंगेश विठ्ठल कुबडे, वय 25 वर्ष, रा. बेसुर याने तिचे मागुन येवून तिचे हात पकडून तोंड दाबण्याचा प्रयत्न करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 21/12/2016 चे 22.13 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत ठवरे, पो.स्टे. बोरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 09/02/2018 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. अ.वि.दिक्षीत, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार 03 वर्ष सश्रम कारावास व 2,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी कैद कलम 341 भांदवि मध्ये 1 महिना साधी कैद व 200/–रू. दंड, दंड न भरल्यास 10 दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने श्रीमती पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोउपनि. श्री. डि. एन. मात्रे, तर कर्मचारी सहा.फौ. अरूण भुरे, रमेश भुसारी, भवानी प्रसाद मिश्रा, पोहवा. नामदेव कोडापे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर